110311FT0168

कार्यालयीन टिप्पणी

हप्रनिअ कक्ष/ मप्रनिमंडळ
दिनांक: ०९.०३.२०११.

विषय : चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणाच्या समस्या, चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयातील आमदार, शासकीय अधिकारी यांच्यासमवेत दिनांक २८.०२.२०११ रोजी दुपारी ०३.०० वा. मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणाच्या समस्या, चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयातील आमदार, शासकीय अधिकारी यांच्यासमवेत दिनांक २८.०२.२०११ रोजी दुपारी ०३.०० वा. मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर.

हवा प्रदुषण निवारण अभियंता

**मा.सदस्य सचिव :-**

11/3/2011

**मा.अध्यक्षा / सचिव, पर्यावरण :-**

Appd. Pl. circulate to all concern

01/4/2011

FO(R&D)

**चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणाच्या समस्या, चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयातील आमदार, शासकीय अधिकारी यांच्यासमवेत दिनांक २८.०२.२०११ रोजी दुपारी ०३.०० वा. मंत्रालय, मुंबई येथे संपन्न**

**<u>झालेल्या बैठकीचे इतिवृत्त</u>**

चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणाच्या समस्या व सद्यस्थिती, चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा.मंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर जिल्हयातील विधान सभा सदस्य, विधान परिषद सदस्य व संबंधित शासकीय अधिकारी यांची बैठक दि.२८.०२.२०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये मा.राज्यमंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य, मा.प्रधान सचिव, उद्योग तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालक सचिव, जिल्हाधिकारी, इतर शासकीय अधिकारी, म.औ.वि.महामंडळाचे अधिकारी, म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव व संबंधित अधिकारी, तसेच चंद्रपूर जिल्हयातील उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मा.मंत्री, पर्यावरण यांनी चंद्रपूर जिल्हयातील कारखान्यामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. तसेच यासंदर्भात मोठया उद्योगांचे प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनासंबंधी चर्चा करण्यात आली. केंद्र शासनाने महाराष्ट्रातील पांच ठिकाणे गंभीर प्रदुषित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून त्यामध्ये चंद्रपूर जिल्हयातील काही भागाचा समावेश करण्यात आलेला आहे व तेथे नवीन उद्योगांवर बंदी घालण्यात आलेली होती. आवश्यक त्या उपाययोजना केल्यामुळे इतर ४ ठिकाणची बंदी उठविण्यात आली होती. परंतु चंद्रपूर जिल्हयातील नवीन उद्योग उभारण्याबाबतची बंदी अद्याप उठविण्यात आलेली नाही. चंद्रपूर जिल्हयातील प्रदूषण कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे असे मंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे.

मा.सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. चंद्रपूर जिल्हयाचा कृती आराखडा केंद्र शासनास सादर केलेला आहे. परंतु सदर कृती आराखडा केंद्र शासनास मान्य नसून अल्पकालीन योजना (Short Term) सादर करण्यासंबंधी सांगण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणाची पातळी अति गंभीर असून या संबंधी प्रदूषण करणाऱ्या सर्व उद्योगांशी चर्चा करण्यात आलेली आहे व त्यांना प्रदूषण कमी करण्यासंबंधी उपाययोजना करण्याबाबत सांगण्यात आले आहे. तसेच संबंधित विभागांनी उदा.बांधकाम विभाग, औद्योगिक विकास महामंडळ, नगर विकास विभाग, चंद्रपूर व बल्लारपुर नगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग यांनी त्यांच्या वतीने सहकार्य करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

..२..



15

चंद्रपूर जिल्हयातील उद्योगाबाबत, प्रदूषण कमी करण्यासाठी उद्योगाने केलेल्या उपाययोजना सीईपीआय इंडेक्स याबाबतची विस्तृत माहितीचे सादरीकरण करण्यात आले. सदस्य सचिव यांनी नमूद केले की, जे उद्योग ट्रकमधून वाहतुक करतात, त्यांना यंत्रचलित बंदिस्त ट्रकमधून (Mechanical operated closed trucks) कोळसा/इतर खनिज वाहतुक करण्यासंबंधी निर्देश दिलेले आहेत व यासाठी सदर उद्योगांना ३१.०३.२०११ पर्यंत मुदत दिलेली आहे. त्यानंतर जर उद्योगाने / वे.को.लि. यांनी वरील निर्देशाचे पालन केले नाही तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल, तसेच याबाबत जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक व परिवहन विभागास योग्य ते निर्देश देण्यात येईल.

मा.श्री.सुधीर मुनगंटीवार, विधान सभा सदस्य यांनी नमूद केले की, चंद्रपूर जिल्हयासाठी कृती आराखडा तयार केला, परंतु कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. चंद्रपूर व बल्लारपुर नगरपालिकेने घरगुती सांडपाणी शुध्द करुन त्याचे पुनर्वापर करण्याचे नमूद केले. कृती आराखडयांवर प्रत्यक्ष कारवाई करण्यासंबंधी निधी उपलब्ध करण्याबाबत विचार व्हावा, असेही सुचित करण्यात आले. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर प्रदूषण कर लावण्याबाबत कायदेशीर तरतुद असावी. उद्योगाने सुधारीत यंत्राचा वापर करावा व वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत सुधारणा करण्याचे सुचविले. चंद्रपूर जिल्हयात जास्त कारखान्यांना परवानगी न देता जेथ उद्योग नाहीत, अशा ठिकाणी उद्योग उभारण्यात यावे, तसेच उद्योगाच्या विस्तारीकरणास सुध्दा परवानगी देण्यात येऊ नये. कमी प्रदूषण व कमी पाण्याचा वापर असणाऱ्या उद्योगांनाच या चंद्रपूर जिल्हयात परवानगी दिली जावी,

सदस्य सचिव यांनी सुचविले की, सीईपीआय मुळे चंद्रपूर जिल्हयात सध्या नवीन उद्योगांवर बंदी आहे, त्यामुळे नवीन उद्योगांना परवानगी देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मा.प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार यांनी नमूद केले की, प्रदूषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रमानुसार उपाययोजना पूर्ण केल्या पाहिजे व जे उद्योग वेळेवर उपाययोजना करीत नाहीत, त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्याचे सुचविले. ट्रकमधून कोळसा वाहतुकीचा प्रश्न वर्षानुवर्षे सुरु आहे, त्यावर लवकरात लवकर उपाययोजना व्हावी. राज्यसरकारला कायद्याप्रमाणे अधिकार आहे, त्याचा वापर करुन प्रदूषण करणाऱ्या उद्योगावर कारवाई करणे शक्य आहे, त्यासाठी वेगळा कायदा किंवा तरतुद करण्याची आवश्यकता नाही.

सदस्य सचिव यांनी नमूद केले की, कृती आराखडयाच्या अंमलबजावणीमधील उपाययोजनांसाठी खर्च संबंधित उद्योगाने करावयाचा आहे.

..३..

मा.श्री.सुधीर मुनगंटीवार, विधान सभा सदस्य यांनी सुचविले की, चंद्रपूर जिल्हयातील प्रदूषणासाठी चंद्रपूर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा समिती गठित करण्यात यावी व त्यामध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश करावा व त्या समितीने दरमहा आढावा घ्यावा.

यावर मा.मंत्री,पर्यावरण यांनी अशा प्रकारची समिती जिल्हास्तरावर गठित करण्याची पडताळणी केली जाईल असे सुचविले.

मा.श्री.नानाजी शामकुळे, विधान सभा सदस्य यांनी शासनाच्या अंदाजपत्रकात पर्यावरणासाठी विशेष तरतुद / निधी असणे आवश्यक आहे. चंद्रपूर जिल्हयातील घुग्घुस, ताडाळी या भागातील सर्व कोलवॉशरीजचे प्रदूषण जास्त असल्यामुळे सदर वॉशरीज यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्याचे सुचविले.

ग्रामीण रस्ते मोठया प्रमाणात कोळसा वाहतुकीसाठी योग्य नाही, तरी त्याचा वापर कोळसा वाहतुकीसाठी करण्यात येऊ नये. रस्त्याची बांधणी सुधारण्यात यावी. या विभागातील उपलब्ध पाण्याच्या साठयाचा वापर उद्योगासाठीच जास्त प्रमाणात होत असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होत आहे. तरी यासंबंधी योग्य नियोजन व्हायला हवे. चंद्रपूर जिल्हयात मलनि:सारण केंद्र उभारण्यात येऊन त्यातील प्रक्रियाकृत पाणी चंद्रपूर थर्मल पॉवर स्टेशनमध्ये वापरण्यात यावे, असे त्यांनी नमूद केले.

श्रीमती शोभाताई फडणवीस, विधान सभा सदस्य यांनी असे नमूद केले की, चंद्रपूर जिल्हयातील / शहरासाठी कृती आराखडा (२००६ व २०१०) ची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी. बिल्ट बल्लारपुर मधून निघणाऱ्या लाईम स्लजची योग्य विल्हेवाट करण्याचे सुचविले. तसेच लाईम स्लजवर लावलेल्या झाडांबाबतच्या पडताळणी अहवाल कृषि विभागाकडून प्राप्त करावा. तसेच इरई नदीचे पात्र ओव्हर बर्डन मुळे बदलणार आहे. तेथील लोकांचे पुनर्वसन झाल्याशिवाय सदर पात्र बदलाचे काम सुरु नये. या भागात खुल्या कोळसा खाणीमुळे जास्त प्रदूषण होत आहे, त्यावर ठोस उपाययोजना करण्यात यावी. प्रत्येक कारखान्याने सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारली पाहिजे. कारखान्याकडून हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा नियमितरित्या चालविण्याबाबत सक्त ताकीद देण्यात यावी. तसेच चंद्रपूर औष्णिक औष्णिक विद्युत केंद्र यांनी हवा प्रदुषणाबाबत तातडीने उपाययोजना करावी.

..४..

श्री.जैनुद्दीन झवेरी, विधान परिषद सदस्य यांनी असे नमूद केले की, ज्या खदानीचे भाडे पट्टे संपलेले आहे, अशा उद्योगांना नुतनीकरण देण्यात येऊ नये. कोळसा खाणीमुळे झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांचे सपाटीकरण करण्यात यावे. तसेच बल्लारपुर पेपर मिलने वासाची तीव्रता कमी करण्याबाबत युध्द पातळीवर उपाययोजना करावी व जिल्हयातील प्रत्येक कारखान्याने प्रदुषण नियंत्रणासाठी वेगळे एनर्जी मिटर लावावे व मंडळाच्या अधिकाऱ्यांनी भेटीच्या दरम्यान त्याबाबतची प्रत्यक्ष पडताळणी करावी.

मा.श्री.सचिन अहिर, राज्यमंत्री, पर्यावरण, उद्योग व खनिजे यांनी असे नमूद केले की, चंद्रपूर जिल्हयातील कृती आराखडयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. परिसरात जास्तीत जास्त झाडे लावण्यात यावी. खनिज विकास निधीचा उपयोग पर्यावरण संवर्धनासाठीच केला पाहिजे. ज्या उद्योगांवर दंडात्मक कारवाई झाली असेल, अशा उद्योगांचे ना हरकत प्रमाणपत्र देतांना त्यांचे प्रस्ताव प्रलंबित करण्यात यावे. कोलवॉशरीच्या प्रदुषणाबाबत आढावा घेऊन दोषी कोलवॉशरीवर कारवाई करण्यात यावी.

मा.ना.श्री.संजय देवतळे, मंत्री, पर्यावरण यांनी अशा सुचना केल्या की, उद्योगांना देण्यात येणाऱ्या संमतीपत्रातील अटींची पुर्तता केली नसेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करावी. चंद्रपूर जिल्हयात नवीन प्रदूषणकारी उद्योगांना परवानगी देण्यात येऊ नये. उद्योगांमध्ये हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सतत चालु असल्यास किती विजेचा वापर होतो, त्याचे सरासरी युनिट काढून मंडळातर्फे तपासण्यात यावे. बिल्ट बल्लारपुर मधून निघणाऱ्या स्लजच्या ढिगाऱ्यावर झाडे लावण्याबाबतचा पडताळणी अहवाल कृषि विभागाकडून मागविण्यात यावा. वेकोलिच्या कोळसा खदाणीमुळे तयार झालेल्या मातीच्या ढिगाऱ्यांमुळे नदीचे पात्र बदलणे, तेथील स्थानिक लोकांचे पुनर्वसनाचे प्रश्न उपस्थित झाले आहे, याचा अहवाल कृषि विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, जलसंपदा विभाग, भुविज्ञान व खनिज संचालनालय यांचेकडून ३ महिन्यांत अहवाल मागविण्यात यावा. कोलवॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदुषणाच्या प्राप्त तक्रारींची तपासणी करुन दोषी आढळणाऱ्या कोलवॉशरीवर कारवाई करण्यात यावी. चंद्रपूर जिल्हयातील प्रदुषणकारी कारखान्यांच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी सभेला आवर्जुन हजर राहण्याबाबत सुचविले.

सरतेशेवटी मा.मंत्री महोदयांनी सुचविले की,

१. खनिज वाहतुक बंदिस्त यंत्रचलित ट्रकमधूनच करण्यात यावी.

२. खनिज विकास निधीचा विकास करुन चंद्रपूर शहरासाठी बायपास रोड बांधण्याबाबत उपाययोजनाची पडताळणी करावी.

३. औष्णिक विद्युत केंद्राने प्रदुषणाबाबत, तसेच राखेच्या विल्हेवाटीबाबत तात्काळ उपाययोजना करावी.

४. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे ताडाळी क्षेत्राचे रोड व ड्रेनेजबाबत तात्काळ कारवाई करावी.

५. वे.को.लि.ने ओव्हर बर्डनच्या विल्हेवाटीबाबत शास्त्रीय पध्दतीने उपाययोजना करावी.

६. चंद्रपूर कृती आराखडयाबाबत प्रत्येक विभागाने यशस्वीरित्या अंमलबजावणी करावी.

उपस्थितांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहिर केले.

* * * * * * * * * *